भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांच्या आस्थापनेवरील उपसंचालक या संवर्गातून सहसंचालक या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन आदेश क्रमांकः एमएनए-०८२१/प्र.क्र.७२/उ-९**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: २६ मे, २०२६

**संदर्भ**:-१. सा. प्र. वि. शा.नि.क्र.एसआरव्ही-२०८/प्र.क्र.१५९/कार्या-१२, दि.०१.०८.२०१९

२. सा. प्र. वि. यांचे पत्र क्र.ईएसबी-११२६/प्र.क्र.१९/आस्थामं (का.१३), दि.११.०३.२०२६

**शासन निर्णय**

निवडसूची वर्ष २०२५-२६ मध्ये भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांच्या आस्थापनेवरील **उपसंचालक, गट-अ (वेतनस्तर-एस-२३: रु.६७७००-रु.२०८७००) ते सहसंचालक, गट-अ (वेतनस्तर- एस-२६ :रु. ८२२००-रु. २११५००)** या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील तक्त्यामध्ये नमुद अधिकाऱ्यास पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना स्तंभ क्रमांक ४ येथे दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे:-

**पदोन्नतीनंतरची पदस्थापना**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम.मीना शा. निखारे | अ.ज. | प्रमुख कार्यालय, नागपूर |

२. उपरोक्त तक्त्यात नमूद अधिकाऱ्याची पदोन्नती ही खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:-

१. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधीन राहुन पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. सदरील शासन निर्णयास मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आले असुन त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

२. सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यास नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

३. सदर अधिकाऱ्यास देण्यात येणारी तात्पुरती पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

४. सदर अधिकाऱ्यास तात्पुरती पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

३. उपरोक्त अधिकाऱ्याने पदोन्नती न स्विकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्यासन-१२, दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. उपरोक्त अधिकारी ज्या दिनांकास पदोन्नतीच्या दिनांकास रुजु होतील त्या दिनांकापासुन त्यांना पदोन्नती विषयक लाभ अनुज्ञेय होतील.

५. **पदोन्नतीने नियुक्ती दिलेल्या वरील अधिकाऱ्याने त्यांच्या नवीन नेमणुकीच्या ठिकाणी ३० दिवसांच्या आत रुजु व्हावे**. त्यांनी अनाधिकृतरित्या रजेवर जाऊ नये किंवा पदस्थापनेत बदल करण्यासाठी निवेदन / अर्ज देऊ नये. तसे केल्यास ते महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९ च्या नियम २३ चे उल्लंघन झाल्याने शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

६. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करावे व पदोन्नतीच्या ठिकाणी रुजु होणेबाबत सूचना द्याव्यात. तसेच संबंधित अधिकारी पदोन्नतीच्या ठिकाणी रुजु झाल्याचा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२६१८३५५९८५१० असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LAXMIKANT
GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELD, 2.5.4.20=413BEECA50B65438C7A037917CCF1F24D8CA684B65640DF6372EA731FFAC4DFC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2026.05.26 18:37:56 +05'30'

**( लक्ष्मीकांत ढोके )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. मंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. राज्यमंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) अपर मुख्य सचिव (खनिकर्म) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
६) सहसचिव (खनिकर्म) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
८) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई.

९) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२ नागपूर.

१०) सर्व उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय.

११) संबधित अधिकारी (महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांच्यामार्फत).

१२) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर व चंद्रपूर.

१३) निवडनस्ती (उ-९).